# बडनेरा येथे ऑटो कॅड कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी अँड रिसर्च येथील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेच्या वतीने आणि केंद्र शासनाच्या इंडो जर्मन टूल रुम औरंगाबाद च्या संयुक्त विद्यमाने सॉफ्टवेअर कौशल्ये विकसित करणे या उद्देशाने ऑटो-कॅड, अॅन्सिस आणि कॅटिया प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ज्याकरिता इंडो जर्मन टूल रुम औरंगाबादचे चंद्रशेखर सेठी हे प्रशिक्षक लाभले होते.



संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितिन धांदे, उपाध्यक्ष प्रो. विनय गोहाड, कोषाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी यांच्या प्रेरणेने व महाविद्यालयीन प्राचार्य बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मुंधडा, प्रा. सचिन डहाके, प्रा. मोहोड, प्रा. मालखेडे यांनी कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजनाकरिता परिश्रम घेतले. या प्रशिक्षण व कार्यशाळा उपक्रमात ऑटो-कॅड सॉफ्टवेअर मधील विविध घटकांची व्यवस्थित उकल करण्यात आली जसे २ डी, ३ डी या कार्यशाळेचे व अंतिम सत्राचे समापन विभाग प्रमुख प्रा. मुधडा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेमध्ये प्रशिक्षणाची जबाबदारी प्रा. मोहोड व प्रा. मालखेडे यांनी सांभाळली.

महाविद्यालयाचा अनेक वर्षापासून विविध कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि विविध स्पर्धात्मक उपक्रमातून विद्यार्थ्यांकरिता सतत अद्ययावत ज्ञानाच्या संपर्कात ठेवण्याचा प्रयत्न निरंतर कक्षरण्याकरिता विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीचे आधारस्तंभ अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, उपाध्यक्ष प्रा. विनय गोहाड, कोषाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारिणी सदस्य प्रा. हेमंत देशमुख, नितिन हिवसे, अॅड. उदय देशमुख, गजानन काळे, प्रा. रागीणी देशमुख, प्राचार्य प्रा. आमोल बोडखे तसेच संबंधित विभाग प्रमुख सतत प्रयत्नयशील आहेत.

Scanned by CamScanner